# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 26.07.2024** **वार – शुक्रवार**

---

**पूरपाहणी मोहोळ**

पुणे शहरासह जिल्ह्यात झालेली अतिवृष्टी आणि पुरपरिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करुन बाधित नागरिकांना तात्काळ मदत करावी, आपत्तीच्या काळात सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कामे करावीत असे निर्देश केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

शासकीय विश्रामगृह येथे जिल्ह्यातील पूर परिस्थितीबाबत आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

पुरबाधित क्षेत्रातील स्थलांतरीत नागरिकांना आवश्यक त्या सुविधा पुरविण्यात याव्यात. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्याकरीता पुराच्या पाण्यात खराब झालेले किंवा वाहून गेलेले दाखले उपलब्ध करून द्यावेत.

धरणातील पाण्याचा विसर्गामुळे नागरिकांची गैरसोय टाळण्याकरीता विसर्ग करण्यापूर्वी जलसंपदा विभागाने संभाव्य बाधित क्षेत्रातील नागरिक आणि प्रशासनाला पाणी विसर्गाबाबत सूचना द्याव्यात. शहरातील पुरबाधित भागात सीसीटिव्ही यंत्रणा कायान्वित करण्यात यावी. महावितरणच्या वतीने खंडित करण्यात आलेला वीजपुरवठा पुर्वरत करावा. अशी पूरपरिस्थिती भविष्यात उद्भवणार नाही, याबाबत दक्षता घेण्याबाबटाचे निर्देशही मोहोळ यांनी यावेळी दिले.

**खडकवासला विसर्ग**

खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये सुरू असणारा विसर्ग दुपारी 4.00 वाजता पुर्ण पणे बंद करण्यात आला. मात्र आवश्यकतेनुसार विसर्ग पुन्हा कमी-जास्त करण्याची शक्यता आहे अशी माहिती खडकवासला पाटबंधारे विभागानं दिली आहे.

**कारगिल दिवस**

कारगिल युद्धातील भारतीय सैन्याच्या गौरवशाली विजयाला आज 25 वर्षे पूर्ण झाली. दक्षिण कमांडने आजचा हा दिवस मोठ्या अभिमानाने आणि उत्साहाने साजरा केला.

पुण्यातील दक्षिण कमांड युद्ध स्मारक इथं आयोजित एका समारंभात दक्षिण मुख्यालयाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल धीरज सेठ, यांनी पुष्पचक्र अर्पण करून आपल्या हुतात्मा जवानांच्या अतुलनीय शौर्य आणि बलिदानाला आदरांजली वाहिली.
कारगिल विजय दिनानिमित्त दक्षिण कमांडने गेल्या महिनाभरात विविध उपक्रम राबावत त्या माध्यमातून कारगिल युद्धातील माजी जवानांनी संवाद साधला.

कारगिल विजय दिनानिमित्त भोई प्रतिष्ठान तर्फे या युद्धातील विरचक्र विजेते कर्नल ललित राय यांचा सन्मान करण्यात आला.

**<u>डाक चौपाल</u>**
टपाल कार्यालयाच्या भोर उपविभागाच्या वतीनं आज भोर नगरपालिकेच्या सभागृहात डाक चौपाल कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पोस्टातील योजनांची माहिती तसेच विविध सेवा सुविधांविषयी आणि टपाल खात्याच्या माध्यामातून राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांची माहिती नागरीकांपर्यंत पोहोचवण्यात आली.

**<u>पिं-चिं अतिवृष्टी</u>**
पिंपरी चिंचवड शहरातील धरण आणि नदी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात  झालेल्या पावसामुळे रावेत पंपिंग हाऊस येथील पंपिंग यंत्रणेत बिघाड झाल्याने दुरुस्तीचे काम सुरु आहे. त्यामुळे आज दिवसभरात आणि उद्या सकाळचा होणारा पाणीपुरवठा नेहमीपेक्षा उशिरा, कमी दाबाने आणि कमी प्रमाणात  होणार आहे.  पिण्याच्या पाण्यातून जलजन्य रोगांचा प्रसार होण्याची दाट शक्यता असते. या अनुषंगाने नागरिकांनी योग्य ती खबरदारी घ्यावी असं महापालिकेच्या वतीने करण्यात आलं आहे.

**<u>पाऊस सरासरी</u>**
पुणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागात काल अखेरपर्यंत सरासरीच्या ४३ टक्के अधिक पावसाची नोंद झाली आहे. जिल्ह्याच्या काही भागात अजूनही पावसाचा जोर कायम असून आणखी किमान २ दिवस तरी जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. जिल्ह्यात प्रामुख्यानं घाटमाथा परिसरात मुसळधार पाऊस सुरु असून धरणांच्या पाणलोट क्षेत्रात देखील दमदार पावसाची नोंद झाली आहे.

**<u>प्रशिक्षण</u>**
पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने दहावी आणि बारावी उत्तीर्ण मुलींसाठी मोफत अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम चालवले जातात. वाहन निर्मिती उद्योगांमध्ये मुलींना सक्षम करण्याच्या उद्देशानं हा उपक्रम राबविण्यात येतो. या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी ३० जुलै पर्यंत अर्ज करू शकत असल्याची माहिती पिंपरी चिंचवड पालिका प्रशासनाने दिली आहे. महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामध्ये या विषयी माहिती उपलब्ध असल्याच प्रशासनानं सांगितलं.

**<u>महावितरण</u>**
पुणे तसेच पिंपरी चिंचवड शहरासह प्रामुख्याने मुळशी, मावळ, खेड तालुक्यामध्ये अभूतपूर्व अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीचा वीजयंत्रणेला फटका बसला आहे. वीज यंत्रणा आणि अनेक सोसायटयांमधील मीटर बॉक्स पाण्याखाली असल्याने विद्युत अपघात टाळण्यासाठी सुरक्षिततेचा उपाय म्हणून १३ वीजवाहिन्यांसह ६९९ वितरण रोहित्रांचा वीजपुरवठा बदं ठेवण्यात आला आहे. पाण्याचा निचरा झाल्यानंतर, पाहणी करून वीजपुरवठा पूर्ववत सुरू करण्यात येणार असून, तोपर्यंत नागरिकानी सहकार्य करावं, असं आवाहन महावितरणकडून करण्यात आलं आहे.

**<u>पूल दुरुस्ती</u>**
पुणे शहरातील नदीवरील पूल, उड्डाणपूल आणि रेल्वे उड्डाणपूल अशा १५ पुलांच्या डागडुजीसाठी ४ कोटी ४२ लाख रुपयांची निविदा आली आहे. निविदा मंजुरीचा प्रस्ताव पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी स्थायी समितीपुढे ठेवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**